ISSN2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व - संकल्पना पातळीचा अभ्यास

प्राचार्य. डॉ. झेंडे सुखदेव सिताराम
शिक्षणशास्त्र महाविद्यालय ( बी. एड.), माढा, तालुका माढा.
जिल्हा सोलापूर.

**प्रस्तावना:**

मानवाच्या विकासातील प्रत्येक अवस्थेचे महत्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक विकास अवस्थेचे महत्व अनेक प्रकारचे बदल घडून येतात.

मानवी विकासात संक्रमणाचा कालखंड ताणतणावाचा कालखंड किंवा वादळाचा कालखंड समजला जाणारा काळ म्हणजे कौमार्यावस्था होय. कौमार्यावस्था हा संक्रमणाचा कालखंड असल्याने या काळात शारिरीक बदलामुळे भावनिक ताणतणाव वाढलेला असतो. मनातील भाव विचार शरीरात होणारे बदल यामुळे मोकळेपणा संपून एक अवघडलेपण आलेले असते.

विविध प्रसंगानूसार कुमारांना कधी लहान समजून त्यांच्याकडुन आज्ञापालनाची अपेक्षा केली जाते तर कधी कधी मोठ्ठा समजून लहानांना मार्गदर्शन करुन जबाबदार वर्तन करण्याची अपेक्षा केली जाते.

समाजामध्ये जगतांना व्यक्ती विविध भूमिका पार पाडत असतो. या ठिकाणी त्याला मिळणारी वर्तणूक त्यांची इतरांच्या व स्वत:च्या भावनांना ओळखुन सुयोग्य वेळी योग्य प्रतिक्रीया देण्याची क्षमता या आधारे त्यांच्याविषयी लोकांची व त्यांची स्वत:ची प्रतिमा निर्माण होत असते. ही प्रतिमा स्व.-बाबतची त्यांची स्वत:ची कल्पना असल्याने त्यालाच स्व-संकल्पना असे म्हणतात.

व्यक्तीचा स्वत:कडे पाहण्याचा दृष्टिकोन इतरांचा त्यांच्यकडे पाहण्याचा दृष्टिकोन इतरांचा स्वत:विषयीच्या व इतरांविषयीच्या भावनांवर आणि इतरांबाबतच्या वर्तन प्रणालीवर स्व-संकल्पना अवलंबून असतात. समाजाने व्यक्तिला स्विकारल्यानंतर त्याचा स्व सुखावतो आणि तो समाजाला अनुरुप वर्तन करण्याचा प्रयत्न करतो यातूनच स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व विकास करुन स्वत:च्या समाजाच्या आणि देशाच्या विधायक मार्गाने विकास करण्यासाठी किशोर धडपडत असतो.

किशोरांना समाजाने स्विकारले नसेल तर मात्र त्याच्य स्वसंकल्पना ह्या समाजाला प्रतिकूल असु शकतात.

महिला अथवा स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आणि अपेक्षा या वेगवेगळ्या असतात. व्यक्तीचे बाह्यरुप आणि अंतरंग यांचा एकत्रित परिणामातून व्यक्तिमत्व घडत असते. विद्यार्थीनीच्या स्व-संकल्पना ही या आधारेच निश्चित होत असतात.

**गरज आणि महत्व :**

आजच्या काळात व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाला अनन्यसाधारण महत्व दिले जाते. व्यक्तीमत्व विकासात

१. आंतरीक सौंदर्य अर्थात स्वभाव गुणवैशिष्ट्ये क्षमता अभिक्ष्मता रुची, अभिरुची इ. विविध गोष्टींचा समावेश होतो.
२. बाह्य सौंदर्य : व्यक्तीचा रंग, वजन, उंची इ.बाबींचा बाह्य सौंदर्यात समावेश होतो.
३. आजच्या काळात स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्यरत आहे. असे एकही क्षेत्र नाही की जे स्त्रियांनी पादाक्रांत केलेले नाही. मात्र तरीही स्त्री कडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन तेवढा अनुकुल नाही. मुलाला वंशाचा दिवा समजले जाते. मुलगी ही जबाबदारी ओझे समजले जाते. स्त्री भ्रुण हत्या समाजात मुलींवर होणारे अत्याचार या सर्वांचा परिणाम स्वसंकल्पनेवर होत असतो.
४. कोणतेही वर्तमानपत्र उघडले की त्यात हुंडयासाठी स्त्रियांचा होणारा छळ, कौटुंबिक हिंसाचार इ. च्या विविध नकारात्मक बातम्या दिसतात. तर दुसरीकडे एखाद्या राज्याच्या कारभारापासून तर घराचा कारभार समर्थपणे पेलणाऱ्या मोलकरणीपर्यंत प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक भूमिकेत ठसा उमटवणाऱ्या स्त्री ची स्व-संकल्पना समजून घेणे महत्वाचे आहे.

**समस्या विधान :**

उच्च माध्यमिक स्तरावरील स्वसंकल्पना पातळीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व-संकल्पनाचा मापन करणे.

**परिकल्पना :**

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींची स्व-संकल्पना ही सरासरी उच्च स्व-संकल्पना आढळते.

**संशोधन पद्धती :** सदरील अभ्यास हा सर्वेक्षण संशोधन पद्धतीने पूर्ण केला.

**संशोधन नमुना :** नमुन्यामध्ये औरंगाबाद शहरातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीन्ीमधून १०० विद्यार्थीन्ीची नमुना म्हणून निवड केली.

**संशोधनाची साधने :** सदरील अभ्यासाच्या माहिती संकलनासाठी डॉ.राजकुमार सारस्वत यांची विश्लेषण व स्व संकल्पना चाचणीचा उपयोग केला.

**माहिती संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन :** संकलित माहितीचे तालिकीकरण करुन मध्यमान व प्रमाण विचलन या संख्याशास्त्रीय सामग्रीचा आधारे विश्लेषण केले.

**परिकल्पना :** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनीची स्व - संकल्पना ही सरासरी पेक्षा चांगली आहे.

तक्ता क्रमांक : १, उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व स्ंकल्पना पातळीबाबत.

| नमुना | मध्यमान | विस्तार |
|---|---|---|
| १०० | १८४.१ | १८०-१८९ |

प्रस्तुत तक्त्यानुसार असे निदर्शनास येते की उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व संकल्पना पातळीचे मिळालेल्या प्राप्तांकानूसार मध्यमान  या विस्तारा दरम्यान येते.

म्हणून उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व - संकल्पना पातळीही सरासरीपेक्षा चांगली दिसून येते.

**निष्कर्ष:१.** उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्वसंकल्पना पातळीही सरासरीपेक्षा चांगली दिसून आली.

## शिफारशी :

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या स्व संकल्पना पातळीमध्ये वाढ होण्यासाठी शिक्षकांनी  विद्यार्थ्यांना स्व संकल्पना म्हणजे काय ते समजून सांगावे.
२. उच्च माध्यमिक विद्यालयात व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन करावे.
३. उच्च माध्यमिक विद्यालयात  तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करणे.
४. उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थीनींना विचार  स्वातंत्र असावे.
५. शिक्षकांनी विद्यार्थीनीच्या भावनांचा आदर करावा.

## संदर्भ ग्रंथ :

१. Ahuwaliya S.P. (२००२), Childern self concept scale Agra : National  Phychological Corporation.
२. Alexander F.E. (१९९६) Self Concept of Childern with visyai Imperments. Re View २८(१) ३J-४३
३. Beaty L.A. (१९९२) Adolescents Self Perce ption as a Function of Vision loss Adolescence,२७,७०७-७४
४. http:// www. britanica.com/EB checked/Topic/६०२/ adjustment.
५. बेस्ट  जे.डब्ल्यु, ( १९९५) रिसर्च इन एज्युकेशन ( ७  वी आवृत्ती) नवी दिल्ली, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड.